# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत मनपाचे
**{ सा.प्र.वि. }** लोकोपयोगी उपक्रम, विकास कामे, जाहीर सुचनांची प्रसिद्धी ही जनसंपर्काच्या विविध माध्यमातून प्रसारण करणे, त्या प्रसिद्धीचा परिणाम विविध विभागाकडे कळविणे इत्यादी कामे करण्याकरिता जाहिरात क्र. १०५९/पी.आर. दि. १७/०३/२०२५ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. प्रविण जे. वानखेडे, कंत्राटी प्रसिध्द सल्लागार यांना करार पद्धतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरिता, कार्यालयीन आदेश क्र. ०४/ ओ.ॲण्ड.एम, दि. ०९/०५/२०२५ अन्वये नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यांनतर त्यांचा नियुक्ती कालावधी दि.०८/११/२०२५ रोजी संपुष्ठात येणार आहे व त्यांची सेवेची विभागाला आवश्यकता असल्यामुळे, श्री. प्रविण जे. वानखेडे, कंत्राटी प्रसिध्द सल्लागार, यांना प्रतिमाह रु.५०,०००/- (प्रतिमहा पन्नास हजार फक्त) प्रमाणे तांत्रिक खंड देऊन दि.०९/११/२०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे दि.११/११/२०२५ पासुन पुढील ६ महिन्याकरिता (दि.१०/०५/२०२६ पर्यंत) मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.
**टिप** :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 364/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 07/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्र. सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत मनपाचे लोकोपयोगी उपक्रम, विकास कामे, जाहीर सुचनांची प्रसिद्धी ही जनसंपर्काच्या विविध माध्यमातून प्रसारण करणे, त्या प्रसिद्धीचा परिणाम विविध विभागाकडे कळविणे इत्यादी कामे करण्याकरिता जाहिरात क्र. १०५९/पी.आर. दि. १७/०३/२०२५ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. प्रविण जे. वानखेडे, कंत्राटी प्रसिध्द सल्लागार यांना करार पद्धतीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरिता, कार्यालयीन आदेश क्र. ०४/ ओ.ॲण्ड.एम, दि. ०९/०५/२०२५ अन्वये नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यांनतर त्यांचा नियुक्ती कालावधी दि.०८/११/२०२५ रोजी संपुष्ठात येणार आहे व त्यांची सेवेची विभागाला आवश्यकता असल्यामुळे, श्री. प्रविण जे. वानखेडे, कंत्राटी प्रसिध्द सल्लागार, यांना प्रतिमाह रु.५०,०००/- (प्रतिमहा पन्नास हजार फक्त) प्रमाणे तांत्रिक खंड देऊन दि.०९/११/२०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे दि.११/११/२०२५ पासुन पुढील ६ महिन्याकरिता (दि.१०/०५/२०२६ पर्यंत) मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.